ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# पर्यटन आणि इतिहास



**Vijaya H. Gaikwad**
**Asso. Professor,**
**Yashwantrao Chavhan Mahavidhyalaya,**
**Karmala, Dist- Solapur.**

**सारांश :-**

पर्यटन हा जरी भूगोलाचा एक विषय असला तरी याचे इतिहासाशी अत्यंत जवळचे संबंध आहेत. पर्यटन भूगोल ही मानवी भूगोलाचीएक शाखा आहे. पर्यटन भूगोलामध्ये विविध प्रदेशातील पर्यटन स्थळांचा अभ्यास केलाजातो. पर्यटन स्थळांचे अनेक प्रकार आहेत. उदा. थंड हवेची ठिकाणे, तिर्थस्थाने, ऐतिहासिक ठिकाणे, धार्मिक ठिकाणेइ.प्रत्येक शास्त्र शाखेचा अभ्यास करतानात्याचाइतर शास्त्र शाखांशी संबंध येत असतो.म्हणजेच कोणतीही शाखा अभ्यासतानादुसऱ्या शाखेची मदत घ्यावी लागते.जसेकी आपण जेव्हा एखाद्या ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या ठिकाणाचा अभ्यास करतो मग तेएखाद्या राजाची राजधानी असो किंवा एखादा कल्ला असेकिंवा एखादे युद्ध झालेलेठिकाण असो. तेव्हा त्या ठिकाणाची भौगोलीक परिस्थिती राजकीयस्थिती, लोकसंख्याइ. सर्व घटक अभ्यासने म्हणजेच आपणत्याठिकाणचा भूगोल, राज्यश्सास्त्र, लोकसंख्याशास्त्र अभ्यासतो. म्हणूनच पर्यटन आणिइतिहास यांचा परस्पर संबंध आहे. म्हणजेच ऐतिहासिक पर्यटन स्थळे हा भूगोलाचाचएक भाग आहे.

सदरच्या शोधनिबंधा मध्ये पर्यटन आणि इतिहास याचा परस्परकसा संबंध आहे हे काही ऐतिहासिक पर्यटन स्थळांची उदाहरणे घेवून स्पष्ट करण्याचा प्रयत्नकेला आहे.

**Kewords**:- (आधारभूत शब्द) पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन स्थळ, इतिहास.

**उद्दीष्टये :-**

१) पर्यटन व इतिहास यांचा परस्पर संबंध अभ्यासणे,
२) महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे,

इतिहास म्हणजे गतकालीन घडून गेलेल्या घटना होय. प्राचीन काळी अनेक शस्त्रज्ञांनी पृथ्वी वरीलनवनवीन भूमीखंडाचा शोध घेण्यासाठी पर्यटन केले. काही लोकांनी व्यापाराच्यानिमित्ताने जल पर्यटनकेले. आज आपणती घटनाएकइतिहास म्हणून पाहतो. म्हणजेच पर्यटन ही संकल्पना अलिकडची नसून प्राचिन कालखंडापासून/ऐतिहासिक काळापासूनती अस्तित्वात आहे.

इतिहास आणि पर्यटन यांचा परस्पर संबंधजूना असून पर्यटनाच्याविकासाच्या सुरूवातीच्या काळामध्ये ऐतिहासिक वस्तुंना भेटी, साम्राज्यांना भेटी उदा. चीन, अरबी पर्यटक भारतात येऊन भारतीय राजे, राज्यकारभार, महाल, जनजीवन यांचा अभ्यास करीत असत. तसेच अलिकडील काळात सुध्दा ऐतिहसिक स्थळांना पर्यटकांच्या भेटीदेण्याचे प्रमाण वाढले आहे. गेल्या काही वर्षामध्ये ऐतिहासिक पर्यटन हे तिसऱ्या स्थानावर आहे. ऐतिहासिक पर्यटन स्थळामध्ये पूरातनकिल्ले, लेण्या, ऐतिहासिक स्मारके, चित्रे, युद्ध सामुग्री, राजमहल, युद्ध मैदाने, मृदा, नाणी आणि संग्रहालये यांचा समावेश होतो.

इतर पर्यटन स्थळांच्या तुलनेत या स्थळांच्या ठिकाणी वर्षभर गर्दी असते म्हणजे थंड हवेची ठिकाणे असताततिथे हंगामातच गर्दी असते. परंतू ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी नेहमीच गर्दी असते. पाहणे व शिकणे या दोन्ही गोष्टी या ठिकाणीघडतात.

**भारतातील ऐतिहासिक पर्यटन :-**

आपल्या देशाला असलेला प्रचिनइतिहास आणि संस्कृती या दोन गोष्टींमुळे परदेशी पर्यटक आपल्या देशाकडे आकर्षित होतात. देशात वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या प्राचिन ऐतिहासिक वास्तु पर्यटकांना भूरळ घालतात. ताजमहल, कुतूबमिनार, चारमिनार, लालकिल्ला, इंडिया गेट, बीबी का मकबरा, मुमताज महल, हवामहल, जलमहल, अजिंठा-वेरुळ लेण्या, राजे-महाराजानी बंधलेलेगड/किल्ले उदा. सिंहगड, मुरुड-जंजीरा, रायगड, प्रतापगड, पन्हाळा, तोरणाइ. भारतातील प्रमुख ऐतिहासिक स्थळे आहेत.ज्यांना फक्त भारतातील नाही तरविदेशी पर्यटकदेखील मोठ्या संख्येने भेटीदेतात आणि प्रत्येक ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या निर्मितीमध्येकोणतातरीइतिहास दडलेला आहे.

विदेशी पर्यटकांच्या संख्येचाविचारकरता भारतात अमेरिकेतून येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त असूनती १४.५%इतकी आहे. तरत्यानंतर बांगलादेश १२.२%, इंग्लंड १०.९%, श्रीलंका, रशिया, कॅनडा, मलेशिया, फ्रॉन्स या देशांचाक्रमांक लागतो.


तसेच २०१४-१५ सालच्या आकडेवारीचाविचारकरता भारतातील तमिळनाडू या राज्याला भेटीदेणाऱ्याविदेशी पर्यटकांची संख्या जास्त असूनती २०.६%इतकी आहे. त्या पाठोपाठ महाराष्ट्र १९.४%, उत्तर प्रदेश १२.९%, दिल्ली १०.३%, राजस्थान ६.८%इतकी आहे. याशिवाय पश्चिम बंगाल, केरळ, बिहार, कर्नाटकइ. राज्यांनाही भेटीदेणारेविदेशी पर्यटक आहेत.

**महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे :-**

महाराष्ट्र हे भारतातील प्रमुख विदेशी पर्यटकांचे आकर्षण केंद्र असून जवळपास ४.३ लाख पर्यटकांनी २०१४ मध्ये महाराष्ट्राला भेट दिली असूनविदेशी पर्यटकांचीविविध राज्यांनी भेटीदेणाऱ्या संख्येमध्ये महाराष्ट्राचादुसराक्रमांक लागतो. महाराष्ट्रामध्ये असणारीधार्मिक, नैसर्गिकतसेच ऐतिहासिक स्थळे ही विदेशी पर्यटकां बरोबरचेदेशी पर्यटकांची सुद्धा आकर्षणाची केंद्रे बनली आहेत. महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांमध्ये अजिंठा-वेरुळ लेण्या, ऐतिहासिक किल्ले/गड, मराठ्यांच्या राजधान्याइ. चा समोवश होतो. महाराष्ट्राला मराठा साम्राज्याचा समृद्ध असा वारसा लाभलेला आहे. यसामध्ये शिवाजी महाराजांचे योगदान अतुलनिय असे आहे. शिवाजी महारांजांच्या यशाचे साक्षिदार असलेलेकिल्ले हे आज पर्यटकांची प्रमुख आकर्षण स्थळे निर्माण झाली आहेत. यात प्रामुख्याने रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, पन्हाळगड, जंजीरा, विशाळगड इ. किल्ल्यांचा समावेश होतो.तसेच महाराष्ट्रातील औरांगाबादजिल्ह्यातीलजगप्रसिध्द अशा अजिंठा-वेरुळ लेण्या या बौद्ध, हिंदू व जैनधर्मियांची प्रमुख आकर्षण केंद्रे ठरल्या आहेत. या लेण्यांनापरदेशीनागरीक मोठ्या प्रमाणावर भेटीदेतात. यामध्ये प्रामुख्यानेजपानी पर्यटकांची संख्या जास्त असते. तसेच भारतातीलइतर राज्यातून भेटीदेणाऱ्या पर्यटकांची संख्याही जास्त असते. हे पुढील आकडेवारी वरुन लक्षात येईल.

| अ.क्र. | राज्य | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | तमिळनाडू | ३३,३४,५९,०४७ | २३.३ |
| ०२ | उत्तर प्रदेश | २०,४८,८८,४५७ | १४.३ |
| ०३ | आंध्र प्रदेश | १२,१५,९१,०५४ | ८.५ |
| ०४ | कर्नाटक | ११,९८,६३,९४२ | ८.४ |
| ०५ | महाराष्ट्र | १०,३४,०३,९३४ | ७.२ |
| ०६ | तेलंगणा | ९,४५,१६,३१६ | ६.६ |
| ०७ | मध्य प्रदेश | ७,७९,७५,७३८ | ५.४ |
| ०८ | पश्चिम बंगाल | ७,०१,९३,४५० | ४.९ |
| ०९ | गुजरात | ३,६२,८८,४६३ | २.५ |
| १० | राजस्थान | ३,५१,८७,५७३ | २.४ |

( संदर्भ - राज्य पर्यटन विभाग २०१५ )




वरील आकडेवारीवरून असे लक्षात येतेकी, महाराष्ट्रातइतर राज्यातून भेटीदेणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त असूनती जवळपास २५ कोटींच्या आसपास आहे. महाराष्ट्राचा यामध्ये पाचवा क्रमांक लागतो.

**शिवनरीकिल्ला** - याला ऐतिहासिक महत्व असून स्वराज्याची स्थापनाकरणाऱ्याछत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणून त्याला महत्व प्राप्तझाले आहे.

**रायगड** - हिंदवी स्वराज्याच्याइतिहासात रायगडाचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे.रायगड हे शिवाजी महाराजांच्या राजधानीचेठिकाण असूनत्यांचे समाधी स्थळ ही आहे.रायगडाचे स्थान हे चोहोबाजूंनी डोंगरांनी वेढलेले आहे. म्हणून भौगोलिक दृष्ट्याही त्याचे महत्व आहे.

औरंगाबाद ही महाराष्ट्राची पर्यटन राजधानी आहे. अजिंठा लेण्या, वेरुळ गुफा, एलिफंटा गुहा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही चारठिकाणेजागतिक वारसा स्थळे म्हणून मान्य पावलेली आहेत.

## निष्कर्ष :-

वरील सर्व भारतातील पर्यटन स्थळांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येतेकी, प्रत्येक पर्यटन स्थळाला ऐतिहासिक महत्व प्राप्तझाले आहे. तिथेकोणतानाकोणताइतिहास घडलेला आहे. म्हणून पर्यटनाचा अभ्यास करतानात्यात्याठिकाणचाइतिहास जाणून घ्यावा लागतोतरइतिहास अभ्यासतानाएखाद्याठिकाणाचे पर्यटनाच्या दृष्टीकोणातून प्राप्तझालेले महत्व अभ्यासावे लागते म्हणूनच इतिहास व पर्यटन यांचा परस्परांशी संबंध आहे हे समजते.

## संदर्भ सूची :-

१) भारतीय पर्यटन विभाग २०१४,
२) राज्य पर्यटन विभाग २०१५,
३) इंटरनेट,
४) शोधपत्रिका/शोधनिबंधइ.